**अवर्षणामुळे बाधित भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्भूत योजना.**

**मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

शासन निर्णय क्र.मत्स्यवि- २०१५ / प्र.क्र.१४८ /पदुम-१२

मंत्रालय विस्तार,मुंबई ४०० ०३२.

दिनांक:- ३०/७/२०१५

वाचा :- महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग,शासन निर्णय क्र.एससीवाय- २०१५/प्र.क्र.११९/ म-७(भाग-१),दिनांक:- २४ जुलै,२०१५.

**प्रस्तावना**

राज्यातील मागील २-३ वर्षातील दुष्काळ/टंचाई, गारपीट, अवकाळी पाऊस इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्याच्या आत्महत्या विचारात घेऊन त्या रोखण्यासाठी दि.१२/०७/२०१५ च्या मंत्रीमंडळ बैठकीत विविध विभागाच्या योजनाबाबत निर्णय झालेला आहे. त्यामध्ये मत्स्यव्यवसाय विभागाची “मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे” या योजनेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अवर्षणामुळे बाधित भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्भूत “ मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे” या योजनेबाबत धोरणात्मक निर्णय झाला असून सदर योजना राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेची कार्यपध्दती व अंमलबजावणी पुढीलप्रमाणे आहे.

१. राष्ट्रीय मत्स्यकी विकास निगम (NFDB) मार्फत मासळी विक्री व्यवस्थापन या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येत होते. NFDB ने सुधारीत मार्गदर्शक तत्त्वानुसार सन २०१५-१६ करीता अशा प्रकारच्या कार्यक्रमासाठी अनुदानाची रक्कम प्रकल्पाच्या ४०% सर्वसाधारणासाठी व ५०% अनुसूचित जाती/जमाती साठी अर्थसहाय्याचे निकष ठेवलेले आहेत. त्यानुसार ६०% राज्य शासन, NFDB ४०% उभारुन १००% अर्थसहाय्याने राबवावयाची ही योजना प्रस्तावित आहे.

सदर फिरते वाहनामध्ये मासे तळणे व शिजवण्यासाठी गॅस व भांडी तसेच साठवणूकीसाठी शीतपेटी वाहनासोबत देण्यात येईल.

ही योजना आत्महत्याग्रस्त विभागामध्ये कार्यान्वीत करण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यकी विकास निगम (NFDB) मार्फत देण्यात येणारे अनुदान ४०% असून उर्वरीत ६०% हिस्सा शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. अर्थसहाय्याचा आकृतीबंध खालीलप्रमाणे राहिल.

| | |
|---|---|
| राष्ट्रीय मत्स्यकी विकास निगम (NFDB) | ४०% |
| राज्य शासन | ६०% |
| **एकूण** | **१००%** |

## बाधित जिल्हे व वाहनाकरीता अधिकतम वाहन मर्यादा

(रु.लाखात)

| अ. क्र. | प्रादेशिक विभाग | जिल्हा | प्रति विभागनिहाय वाहन पुरवठा करावयाचे फिरते वाहन | लाभार्थी गट संख्या | प्रति वाहन अंदाजित किंमत रु.१२.०० लक्ष प्रमाणे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | विदर्भ | १.बुलढाणा<br>२.वाशिम<br>३.अकोला<br>४.यवतमाळ<br>५.अमरावती | २५० | ५० | २५००.० | ५ जणांच्या गटांना १ वाहन पुरवठा करण्यात येईल |
| २. | नागपूर | १.वर्धा | ५० | १० | ५००.० | |
| ३. | मराठवाडा | १.औरंगाबाद<br>२.जालना<br>३.नांदेड<br>४.बीड<br>५.परभणी<br>६.उस्मानाबाद<br>७.लातुर<br>८.हिंगोली | ३६० | ७२ | ३६००.० | |
| | **एकूण** | **१४** | **६६०** | **१३२** | **६६००.००** | |

प्रति वाहनासाठी खर्च रु.१०.०० लक्ष धरुन सदर योजनेचा खर्च दर्शविलेला आहे) घटक निहाय खर्च तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Facility | Cost (Rs.in lakhs) | Remarks |
|---|---|---|---|
| 1. | Vending stall with requisite equipment | 1.00 | |
| 2. | Kiosks and similar trading outlets | 2.00 | |
| 3. | Mobile selling units | 5.00 | Three wheel/Four wheel van |
| 4. | Insulated fish boxes | 0.50 | 2 nos. |
| 5. | Utensils for value addition | 0.10 | |
| 6. | Stove and cooking gas | 0.15 | |
| 7. | Refrigerators | 0.25 | |
| 8. | Any other suitable items | 1.00 | |
| | Total | 10.00 | |

**३. योजनेचा लाभ देण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१) अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी या योजनेचा लाभ देण्यास प्राधान्य देण्यात येईल.

२) पाच व्यक्तींच्या एका गटास एक वाहन देण्यात येईल.

३) महिला बचत गटांना प्राधान्य असेल.

४) वाहनाची देखभाल डिझेल खर्च व ड्रायव्हर याचा भार लाभार्थींवर राहील.

५) एका गटास १००% अनुदानीत मासळी विक्रीसाठी फिरते वाहन देण्यात येईल. (राज्य शासन ६०% NFDB ४०%).

६) लाभार्थी वयोमर्यादा १८ ते ६० अशी राहील.

७) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पाचही लाभार्थीचे ७/१२ व नाव असणे आवश्यक आहे.

८) गटात प्रशिक्षित ड्रायव्हर असणे आवश्यक.

९) सदर प्रस्ताव मागणी संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

१०) प्राप्त निधी व त्याचा विनियोग याबाबतचा हिशोब स्वतंत्रपणे विहित केलेल्या लेखापध्दतीनुसार ठेवण्यात यावा.

११) सदर योजनेसाठी लाभार्थी निवड, योजना अंमलबजावणी व अनुदान वाटप व नियंत्रण यासाठी खालील गठीत समिती काम पाहिल.

| | |
|---|---|
| १. मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. संबंधीत तालुकाचे तहसीलदार | सदस्य |
| ३. कृषी अधिकारी | सदस्य |
| ४. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय | सदस्य सचिव |

४. वार्षिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा नियोजन विकास समित्यांमार्फत (DPDC) अवरुध्द पाण्यातील मत्स्यसंवर्धन या जिल्हास्तरीय योजनेत २४०५ मत्स्यव्यवसाय या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या नियतव्ययातील तरतूद अर्थसंकल्पीत करुन या योजनेचा ६०% खर्च भागविण्यात यावा व उर्वरित ४०% खर्च राष्ट्रीय मत्स्यिकी विकास निगम (NFDB) यांच्याकडून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१५०७३११६५२०४२६०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Nitin Madhavrao Pawar

Digitally signed by Nitin Madhavrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=79d1142b510b75c1201d04efa5ba4e48e243bd2014663c505a44a97e90266500, cn=Nitin Madhavrao Pawar
Date: 2015.07.31 16:54:26 +05'30'

**(नितिन पवार)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) महालेखापाल महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई./नागपूर

२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.मंत्री,मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५) मा.मंत्री,मत्स्यव्यवसाय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६) मा.राज्यमंत्री मत्स्यव्यवसाय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
७) अप्पर मुख्य सचिव,(कृषि विभाग),कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
८) प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
९) प्रधान सचिव (नियोजन),नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
१०) सचिव,(मदत व पुनर्वसन),महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
११) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
१३) कक्ष अधिकारी, (पदुम-१६), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) जिल्हाधिकारी, औरंगाबाद/जालना/नांदेड/बीड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/हिंगोली/अमरावती/बुलढाणा/वाशिम/अकोला/यवतमाळ/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली यांना निर्देशित करण्यात येते की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या सदर योजनेसाठी देण्यात यावयाच्या अर्थसहाय्यासाठी जिल्हा नियोजन विकास योजनेअंतर्गत संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना आवश्यक निधी उपलब्ध करुन दयावा.
१५) प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर
१६) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, **औरंगाबाद/जालना/नांदेड/बीड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/**हिंगोली/अमरावती/बुलढाणा/वाशिम/अकोला/यवतमाळ/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, **औरंगाबाद/जालना/नांदेड/बीड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/**हिंगोली/अमरावती/बुलढाणा/वाशिम/अकोला/यवतमाळ/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली
१८) निवड नस्ती.